**महाराष्ट्र शासन**
**परिवहन आयुक्त कार्यालय**
**५ वा मजला, टेलिकॉम बिल्डींग नं २,**
**महात्मा गांधी रोड, फाऊंटन, मुंबई ४०० ००१.**

दुरध्वनी क्रमांक : ०२२-२०८२६४९८
ई-मेल आयडी : dytccomp.tpt-mh@gov.in

---

**क्रमांक:** पआका/का-११/HSRP/२०२५/जा.क्र. 7613 दिनांक:- 25 JUN 2025

**प्रति,**
**सर्व प्रादेशिक परिवहन अधिकारी/**
**उप प्रादेशिक परिवहन अधिकारी,**

**विषय :-** दि.०१/०४/२०१९ पुर्वीच्या जुन्या वाहनांना हाय सिक्युरिटी रजिस्ट्रेशन नंबर प्लेट (HSRP) बसविण्याबाबत.

**संदर्भ :-** १. या कार्यालयाचे परिपत्रक क्र.६८/२०२४ जा.क्र.१४८७९दि.२३.१२.२०२४.
२. या कार्यालयाचे परिपत्रक क्र. १८/२०२५ जा.क्र. ३५२५दि.२०.०३.२०२५.
३. या कार्यालयाचे परिपत्रक क्र. ३७/२०२५ जा.क्र. ६५६१ दि.०२.०६.२०२५
४.या कार्यालयाचे परिपत्रक क्र.४२/२०२५ जाक्र ७३५२ दि. २०.०६.२०२५

केंद्रीय मोटार वाहन नियम , १९८९ च्या नियम ५० नुसार वाहनांस HSRP बसविण्याची तरतूद आहे. तसेच रस्ते व महामार्ग मंत्रालय, नवी दिल्ली यांच्या G.S.R. ११६२ (E) दि.०४/१२/२०१८ व S.O. ६०५२ (E) दि ०६/१२/२०१८ नुसार दि.०१/०४/२०१९ पासुन नोंदणी होणाऱ्या सर्व नवीन वाहनांना हाय सिक्युरिटी रजिस्ट्रेशन नंबर प्लेट बसविण्याची तरतूद करण्यात आली आहे. मा. सर्वोच्च न्यायालयाने रिट याचिका क्र. १३०२९/१९८५ (एम.सी.मेहता विरुध्द केंद्रशासन) मध्ये दि.०१/०४/२०१९ पूर्वी नोंदणी झालेल्या सर्व वाहनांना HSRP बसविण्याचे निर्देश देण्यात आले असून त्याबाबतचा आढावा रस्ते व महामार्ग मंत्रालय नवी दिल्ली यांचेकडून घेण्यात येत आहे.

या कार्यालयाच्या संदर्भ क्रमांक ४ मधील परिपत्रकानुसार ०१.०४.२०१९ पूर्वी नोंदणी झालेल्या वाहनांना HSRP बसविण्यासाठी दिनांक १५.०८.२०२५ पर्यंत अंतिम मुदतवाढ देण्यात आलेली आहे.

HSRP बसविण्याच्या कामाला गती येण्यासाठी व मा. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशाची अंमलबजावणी विहीत वेळेत पूर्ण होण्यासाठी या कार्यालयाच्या संदर्भ क्रमांक ३ मधील दिनांक ०२.०६.२०२५ रोजीचे परिपत्रक क्र. ३७/२०२५ नुसार दिलेले निर्देश कायम राहतील.

**(विवेक भीमनवार)**
**परिवहन आयुक्त**
**महाराष्ट्र राज्य, मुंबई.**